**Volume: 4 Issue: 2 Pages: 46-48**




# मराठी भावकविता: अंतरंग आणि स्वरूप

**[*1] प्रा. डॉ. प्रवीण घारपुरे**

[*1] मराठी विभाग प्रमुख, अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम, ता. नरखेड, जि. नागपूर, महाराष्ट्र, भारत

**Article Info.**
**E-ISSN: 2583-6528**
**Impact Factor (SJIF): 6.876**
**Peer Reviewed Journal**
**Available online:**
**www.alladvancejournal.com**

**Received:** 21/Jan/2025
**Accepted:** 22/Feb/2025

***Corresponding Author**
**प्रा. डॉ. प्रवीण घारपुरे**
मराठी विभाग प्रमुख, अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम, ता. नरखेड, जि. नागपूर, महाराष्ट्र, भारत

**सारांश:**
भावकाव्य म्हणजे भावनांच्या तीव्रतेने आणि रसपूर्ण अभिव्यक्तीने नटलेले काव्य. या काव्यप्रकारात कवीच्या हृदयातील भावना सौंदर्यपूर्ण शैलीत मांडल्या जातात. भावकविता मुख्यतः श्रृंगारिक, भक्तिरसात्मक, देशप्रेमपर, करुणरसप्रधान आणि वात्सल्यप्रधान अशा विविध स्वरूपांत आढळते. भावकवितेच्या माध्यमातून वाचकाच्या अंतःकरणात सौंदर्यदृष्टी निर्माण करणे, मानवी भावनांचे उत्कट प्रकटीकरण करणे, सामाजिक व आध्यात्मिक जाणिवा विकसित करणे, साहित्य आणि जीवन यामधील संवेदनशील नाते दृढ करणे हाच उद्देश प्रतीत होतो. कवी आपल्या वैयक्तिक भावनांचे प्रकटीकरण करीत असताना सामाजिक परिस्थितीवरील चिंतनही मांडत असतो. मानवी नातेसंबंधांचे सौंदर्य उलगडून संवेदनशीलतेला जागृत करीत असतो. त्यासाठी विविध प्रतिमांमध्ये निसर्गचित्रे, मानवी हावभाव, अध्यात्मिक अनुभव, सौंदर्यदर्शन निर्मिती आपल्या भावकाव्यात निर्माण करीत असतो. आपल्या अनुभूतींना भावकाव्यातून हळुवार, लयबद्ध, सहज, प्रतीकात्मक पद्धतीने अभिव्यक्त करीत असतो. भावकाव्य लेखन करणाऱ्या प्रमुख कवींमध्ये कुसुमाग्रजाची सामाजिक भान असलेल्या भावकविता, केशवसुत यांची स्वातंत्र्य आणि नवचैतन्याने भारलेल्या कविता, वि. स. खांडेकर यांची करुणरसप्रधान आणि राष्ट्रप्रेमपर कविता, बा. भ. बोरकर यांची सौंदर्यदृष्टी आणि निसर्गप्रतिमा यांचा सुरेख संगम असलेली कविता, मंगेश पाडगांवकरांची प्रेम, वात्सल्य आणि जीवननिष्ठेने भारलेल्या कविता, शांता शेळके यांची कोमल भावना, आईचे प्रेम आणि निसर्गचित्रण करणारी कविता आणि इंदिरा संतांची वात्सल्यप्रधान आणि साध्या, सोप्या शैलीतील कविता मराठी साहित्यात विशेषत्वाने प्रत्ययास येते. यासारख्या अनेक कवींचे मराठी भावकवितेतील योगदान नाविन्यपूर्ण आहे.

**मुख्य शब्द:** जीवन संघर्ष, सामाजिक जाणीव, निसर्ग सौंदर्य, प्रेमातील उत्कटता, मातृत्वाचे वात्सल्य आणि आध्यात्मिकता, भावना, संवेदना, आनंद, दु:ख, प्रेम, भक्ती, करुणा, निसर्गप्रेम.

## प्रस्तावना:

मराठी साहित्याचा प्रवास प्राचीन संतसाहित्यापासून ते आधुनिक कवितांपर्यंत विस्तारित आहे. या प्रवासात भावकाव्याने विशेष महत्त्व प्राप्त केले आहे. साहित्याच्या विशाल प्रवाहामध्ये काव्य हा एक संवेदनशील आणि मनाला भिडणारा प्रकार आहे. त्यातील भावकाव्य म्हणजे मानवाच्या हृदयातील गूढ भावना, संवेदना आणि सौंदर्य यांचे काव्यमय प्रतिबिंब. कवीच्या अंतःकरणातून सहजपणे उमटलेल्या, रसिकाच्या मनाला भिडणाऱ्या, आत्मानुभूतीचा ठसा उमटवणाऱ्या कविता म्हणजे भावकाव्य. भावकाव्य हे केवळ शब्दांचे सौंदर्य नसून, त्यामध्ये जीवनाचा सारांश, मानवी मनाचा गहिरा स्पर्श आणि भावनांचे विविध रंग साकारलेले असतात. भावकाव्य म्हणजे मानवी भावनांचे उत्कट आणि काव्यमय स्वरूप, जिथे प्रेम, भक्ती, करुणा, राष्ट्रप्रेम, निसर्ग सौंदर्य आणि आत्मसंवाद यांचे सूक्ष्म दर्शन घडते. भक्तिरस, श्रृंगाररस, करुणरस, वात्सल्यरस आणि स्वदेशप्रेमाचा प्रभाव यात सहजपणे दिसून येतो.

भावकाव्य हे केवळ हृदयस्पर्शी नसून, ते वास्तव जीवनातील संघर्ष, सामाजिक जाणीव, निसर्गातील सौंदर्य, प्रेमातील उत्कटता, मातृत्वाचे वात्सल्य आणि आध्यात्मिक शुद्धता यांचे प्रभावी दर्शन घडवते. भावकवितेत शब्दांचा अलंकारिक प्रयोग, गेयता, प्रतीकात्मकता आणि रूपकांची सजावट यामुळे तिचे सौंदर्य अधिक खुलते. भावकाव्य ही केवळ कवीची कल्पना नसून, ती रसिकांच्या मनातील भावनांना प्रतिसाद देणारी कविता आहे. त्यामुळेच भावकविता साहित्यविश्वातील एक अविभाज्य आणि श्रेष्ठ घटक आहे.

## भावकाव्याचा उगम

भावगीत हे मूळचे ग्रीक. वीणेप्रमाणे दिसणारे, पण आकाराने लहान असणारे 'लायर' या नावाचे एक वाद्य असे. त्यावर जे गीत वाजविण्यात येई त्यास 'लिरिक' म्हणत. 'लिरिक' पुढे इंग्लंडमध्ये गेले व इंग्लिश झाले. आपल्याकडे इंग्रजी वाङ्मयाचे परिशीलन सुरू झाले, तेव्हा ते इकडे आले. अंगच्या गुणामुळे आपल्या कवींना ते प्रिय झाले व त्यांनी

त्यास आपणावले. आरंभी आरंभी त्याला वीणागीत, वैणिक, वीणाकाव्य, तंतुगीत ही जी नावे मिळाली, ती लिरिक या शब्दाची अक्षरशः भाषांतरे होती. मात्र या नावात अन्वयार्थकता नव्हती म्हणून ती पुढे लोप पावली व भावगीत हेच नाव प्रचलित झाले असे दिसून येते.

भावकाव्याचा उगम प्राचीन भारतीय संस्कृती, वेद-उपनिषदांतील मंत्र, महाकाव्यांतील (रामायण-महाभारत) प्रसंग, तसेच भक्तिसाहित्य आणि आधुनिक कविता यामधून झाला. संस्कृत साहित्याच्या सुवर्णयुगात कालिदास, जयदेव यांसारख्या कवींनी भावप्रधान काव्याची मुहूर्तमेढ रोवली. संतसाहित्यात ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, मीराबाई, कबीर यांसारख्या संतकवींनी भक्तिरस आणि करुणरसाने भारलेली अभंगवाणी दिली. आधुनिक काळात केशवसुत, बालकवी, कुसुमाग्रज, मंगेश पाडगांवकर, शांता शेळके, बा. भ. बोरकर यांनी भावकाव्याचा नवा प्रवाह निर्माण केला.

## भावकाव्य म्हणजे काय?

‘भावकाव्य म्हणजे हृदयाला स्पर्श करणारे, सौंदर्याची, प्रेमाची, भक्तीची किंवा मानवी जीवनातील विविध भावनांची अभिव्यक्ती करणारे काव्य’. या काव्यात कवीच्या अंतःकरणातील संवेदनशीलता, आत्मानुभूती आणि उत्कट भावनांची अभिव्यक्ती होते. भावकाव्य हे रसप्रधान असून, ते वाचकाच्या हृदयात सौंदर्य व संवेदनशीलता निर्माण करते. भावकवी हा अखिल सृष्टीला आपल्याकडे ओढून घेतो. तिच्यात शिरून तिला आत्मानुभवाने रूपीत करतो, आणि मग तिला आपल्या मनोवृत्तीला अनुसरून अनुकूल अशा छंदांच्या व शब्दांच्या द्वारे प्रगट करतो. तेव्हा भावगीतांत आत्मानुभूतीची अभिव्यक्ती, स्वयंस्फूर्ती व कल्पनाशक्ती ही जी वैशिष्ट्ये असतात, ती काव्याच्या अन्यप्रकारांत नसतात. भावगीतात कवीच्या व्यक्तिगत भावनेच्या अविष्करणाला विशेष महत्त्व आहे. आविष्कृत भावना अच्युत्कट व उत्स्फूर्त असावी. ती जितकी विशाल व व्यापक, तितका तिचा आस्वाद घेणारे रसिक अधिक. सार्वजनिक अनुभव ज्या त्वरेने अंतःकरणात पटतो, त्या त्वरेने विशिष्ट अनुभव पटत नाही. यासाठी कवींचे निरीक्षण सूक्ष्म असावे आणि अनुभव सर्वस्पर्शी खोल असावा. सृष्टीच्या क्षेत्रात एखादा विषय काव्य अनुकूल दिसताच त्याचे अंतःकरण त्याक्षणी उचंबळून यावे. आपले नवे नवे विचार, वेगवेगळे भाव, निरनिराळया वृत्ती, क्षणाक्षणाला बदलणाऱ्या लहरी आणि विविध व विपुल अनुभव यांचा उद्रेक होताच त्यांच्यावर त्याला समर्पक शब्दांचा साज चढविता आला पाहिजे.

## भावकवितेचे स्वरूप

भावकविता म्हणजे मानवी मनातील भावना, संवेदना, आनंद, दुःख, प्रेम, भक्ती, करुणा, निसर्गप्रेम आणि सामाजिक जाणीवांचे काव्यमय प्रतिबिंब होय. ही कविता रसिकाच्या मनात थेट परिणाम घडवते आणि त्याच्या अंतःकरणाला भिडते. भावकविता हृदयातून उमलते आणि शब्दांतून व्यक्त होते. हृदयस्पर्शी आणि संवेदनशील भाषाशैली, लयबद्ध रचना पद्धती, गेयता आणि सौंदर्यपूर्ण प्रेमविषयक जाणीवा, करुणा, भक्ती व राष्ट्रप्रेम यांचे उत्कट चित्रण भावकाव्यात दिसून येते. प्रतिमा, रूपक, अलंकारांचा प्रभावी वापर केल्यामुळे भावकाव्याची रचना अधिकच खुलून दिसते आणि थेट मनाचा ठाव घेतला जाते.

आपल्याकडे भावगीत लिहिणाऱ्यांची जी यशस्वी परंपरा निर्माण झाली, तिच्यांतल्या नामवंतांनी पाश्चात्य भावगीतांचे अंतरंग आत्मसात केले, पण बहिरंग मात्र आपलेच कायम ठेवले. त्यामुळे भावगीतात आरंभी एक अगर दोन चरणांचे पालुपद, नंतर जास्तीत जास्त तीन चरणांचा अंतरा व शेवटी पुन्हा एक चरणाचे कडवे असा प्राचीन पदपद्धतीचा थोड्याफार फेरबदलाने अवलंब केल्याची दृष्टीस पडते. त्यात क्वचित त्याच त्या शब्दांचा पुनरुच्चार आढळतो. तो जुन्या ओव्यातला अवशेष आहे आणि मधून मधून दिसणारा भावगत उद्गारांचा प्रकार हा अभंगातून व पोवाड्यातून परंपरीत झाला आहे. भावगीताला सध्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे, ते निरनिराळ्या प्रकृतीच्या व वेगवेगळ्या परिस्थितीत वाढलेल्या कवींच्या प्रयत्नांचे फळ आहे.

## भावकवितेचे प्रकार

### 1. श्रृंगारिक भावकविता

श्रृंगार हा रसांचा राजा मानला जातो. मानवी मनातील प्रेम, आकर्षण, सौंदर्य, विरह, एकात्मता आणि अनुराग या भावनांचे उत्कट आणि काव्यमय दर्शन घडवणाऱ्या कविता म्हणजे श्रृंगारिक भावकविता होय. श्रृंगारिक भावकविता प्रेमाच्या विविध रंगांनी नटलेली असते. ही कविता प्रेमी-प्रेयसीचे नाते, निसर्गातील सौंदर्य, विरहातील वेदना, प्रेमातील माधुर्य, प्रतीक्षा, हळवे क्षण आणि समर्पणभावना यांचे सुंदर चित्रण करते. श्रृंगारिक भावकविता प्रेमाच्या विविध टप्प्यांना स्पर्श करते. प्रेमाची पहिली चाहूल, नजरेतून उमटणारे भाव. प्रेमातील गोडवा, संवाद, भेटीगाठी, प्रेमींच्या ताटातुटीतील वेदना, आठवणी, आत्मसमर्पण, प्रेमाचे निस्सीम स्वरूप यासारख्या भावछटांना स्पर्श करते. शृंगारिक भावकवितेत रूपक, उपमा, अनुप्रास आणि प्रतिमांचा प्रभावी वापर आढळतो. कवी निसर्गातील फुलं, चंद्र, तारे, वारा, पाऊस, नदी, समुद्र यांचा उपयोग करून प्रेमाचे सौंदर्य व्यक्त करतात. श्रृंगारिक कविता बहुधा गेय असते. संत साहित्यापासून ते आधुनिक कवितांपर्यंत अनेक कवितांमध्ये गीतात्मकता आढळते. उदा. कुसुमाग्रज, केशवसुत, भा. रा. तांबे, मंगेश पाडगावकर...आदी कवींच्या कवितांचा अनुभव येतो.

### 2. भक्तिरसात्मक भावकविता

भक्तिरस हा काव्यातील श्रेष्ठ रस मानला जातो. यामध्ये ईश्वरावरील अखंड श्रद्धा, समर्पण, भक्तीभाव, प्रेम, विनम्रता आणि आत्मनिवेदन यांचे प्रभावी चित्रण केले जाते. भक्तिरसात्मक भावकविता ही ईश्वरभक्तीच्या भावनांनी भारलेली असल्यामुळे भक्तिरसात्मक भावकविता ही ईश्वरभक्ती, आदर, श्रद्धा, समर्पण भाव व्यक्त करणारी कविता आहे. उदा. तुकाराम, नामदेव, रामदास यांच्या अभंग-ओवी. यामध्ये भक्त आणि भगवंत यांचे नाते अतिशय हृदयस्पर्शी रीतीने व्यक्त होते. ही कविता वाचताना किंवा ऐकताना मन शांत, समाधानी आणि भक्तिभावाने भारलेले वाटते. भक्त स्वतःच्या भावना थेट परमेश्वराशी बोलून व्यक्त करतो. भक्त स्वतःला संपूर्णपणे ईश्वराच्या चरणी अर्पण करतो. भक्त आणि ईश्वर हे गुरु-शिष्य, सेवक-स्वामी, प्रेयसी-प्रियकर, माता-पुत्र अशा विविध नात्यांमध्ये गुंफलेले असते. उदा. संत नामदेवांनी विठोबाशी केलेली मैत्री, तर संत तुकाराम यांनी विठोबाला जीवाभावाचा सहचर मानले आहे. भक्तिरसात्मक कविता बहुतेक वेळा अभंग, ओवी, गवळण, भजन किंवा कीर्तनाच्या रूपात आढळते. उदा. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अभंगांमध्ये भक्तिरसाची गोडी अनुभवता येते.

### 3. देशप्रेमपर भावकविता

देशप्रेम म्हणजे स्वतःच्या मातृभूमीवर असलेली उत्कट निष्ठा, भक्ती आणि त्यागभावना. ही भावना रक्तात मिसळलेली असते आणि माणसाला आपल्या देशासाठी काहीही करण्यास प्रवृत्त करते. देशप्रेमपर भावकविता ही देशप्रेमाच्या गोडव्याने, त्यागाने आणि बलिदानाने भारलेली असते. यामध्ये मातृभूमीच्या सौंदर्याचे, तिच्या संस्कृतीचे, पराक्रमाचे आणि ऐतिहासिक गौरवगाथेचे वर्णन असते. या कवितेत भारताच्या संपन्न संस्कृतीचे, नैसर्गिक सौंदर्याचे, महान परंपरांचे वर्णन असते. उदा. "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" असा भाव असतो. देशाच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या वीरांची आठवण. स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि त्यांचा त्याग या बाबींचा समावेश असतो. प्राचीन काळातील देशभक्तांचे देशभक्तीपर

प्रेमभाव रामायण आणि महाभारतातील वर्णने, छत्रपती शिवाजी महाराज यांचे पोवाडे, संभाजी महाराजांची कवने (शत्रूशी झुंज देण्याचा धगधगता जाज्वल्य देशप्रेम). रचलेली आहेत. प्राचीन काळातील पोवाडे आणि वीरगाथांपासून ते आधुनिक कविता आणि गाण्यांपर्यंत देशप्रेम हा सतत वाहणारा स्रोत आहे. देशप्रेम फक्त शब्दांत नसून, ती कृतीतून व्यक्त होणारी भावना आहे.

### 4. करुणरसप्रधान भावकविता

करुणरस हा भावकाव्यातील अत्यंत हृदयस्पर्शी आणि संवेदनशील रस आहे. या रसात वियोग, दु:ख, वेदना, अपघात, संघर्ष, समाजातील अन्याय, शोक आणि माणसाच्या भावनिक हळवेपणाचा प्रभावी आविष्कार होतो. करुणरसप्रधान भावकविता वाचकाच्या मनाला चटका लावते, त्याच्या भावना जागृत करते आणि त्याला विचार करायला भाग पाडते. संत कवींनी समाजातील दुःख, अन्याय, गरीब-शोषितांच्या वेदना यांचे प्रभावी दर्शन घडवले आहे. संत तुकारामांनी जीवनातील हतबलता, दुःख आणि मानवजातीची असहायता यावर भाष्य केले. संत चोखामेळा त्यांनी दलितांचे दु:ख आणि समाजातील विषमता मांडली. संत जनाबाईंनी स्त्रीजीवनातील दु:ख आणि संकटे त्यांनी वर्णिली. तसेच आधुनिक कवींच्या भावकवितेत देखील गरिबांचे, अपंगांचे, समाजात पीडितांचे दुःख आहे. आधुनिक कवितांमध्ये करुणरस फक्त वैयक्तिक दुःखापुरता मर्यादित नसून, तो सामाजिक समस्या, राजकीय अस्थिरता, युद्ध, स्थलांतर, बेरोजगारी आणि नैसर्गिक आपत्ती यावर आधारित आहे. करुणरसप्रधान भावकविता केवळ दुःख दाखवण्यासाठी नसून, ती वाचकाच्या मनाला हलवते, विचार करायला लावते आणि त्याला अधिक संवेदनशील बनवते.

### 5. वात्सल्यप्रधान भावकविता

वात्सल्यरस हा मातेचे आपल्या अपत्यावर असलेले प्रेम, त्याग, काळजी, आणि ममत्व यांचे सुंदर चित्रण करणारा रस आहे. फक्त मातृप्रेमच नव्हे, तर वडिलांचे प्रेम, शिक्षकांचे विद्यार्थ्यांवरील प्रेम, वडिलधाऱ्यांचे लहानांवरील प्रेम आणि सजीव-निर्जीव प्राण्यांवरील माणसाचे प्रेम या भावनाही वात्सल्यरसात येतात. वात्सल्यप्रधान भावकवितेत आईची ममता, मुलांचे निरागस भावविश्व, आई-वडिलांचे त्याग, मुलांचे निरागस खेळ, प्रेमळ संवाद यांचे सुंदर आणि हृदयस्पर्शी वर्णन केले जाते. मुलांचे आई-वडिलांवरील प्रेम, त्यांची जडणघडण आणि त्यांच्यातील नाते, गुरु-शिष्य नाते आणि विद्यार्थ्यांवरील प्रेमळ मार्गदर्शन, माणसाने प्राण्यांवरील प्रेम आणि काळजी व्यक्त करण्याचे चित्रण तसेच संत साहित्यात वात्सल्यरस मोठ्या प्रमाणावर आढळतो. विशेषतः संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत जनाबाई यांनी ईश्वरभक्तीत वात्सल्यभाव प्रकट केला आहे. आधुनिक मराठी काव्यातील वात्सल्यरसप्रधान भावकवितेचे लेखन बालकवी (त्र्यंबक बापूजी ठोंबरे), कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर), ग. दि. माडगूळकर, सुरेश भट, मंगेश पाडगावकर यांच्यासारख्या अनेक कवींनी केले आहेत.

## समारोप

अशाप्रकारे भावकवितेच्या माध्यमातून वाचकाच्या अंतःकरणात सौंदर्यदृष्टी निर्माण करणे, मानवी भावनांचे उत्कट प्रकटीकरण करणे, सामाजिक व आध्यात्मिक जाणिवा विकसित करणे, साहित्य आणि जीवन यामधील संवेदनशील नाते दृढ करणे हाच उद्देश प्रतीत होतो. कवी आपल्या वैयक्तिक भावनांचे प्रकटीकरण करीत असताना सामाजिक परिस्थितीवरील चिंतनही मांडत असतो. मानवी नातेसंबंधांचे सौंदर्य उलगडून संवेदनशीलतेला जागृत करीत असतो. त्यासाठी विविध प्रतिमांमध्ये निसर्गचित्रे, मानवी हावभाव, अध्यात्मिक अनुभव, सौंदर्यदर्शन निर्मिती आपल्या भावकाव्यात निर्माण करीत असतो. आपल्या अनुभूतींना भावकाव्यातून हळुवार, लयबद्ध, सहज, प्रतीकात्मक पद्धतीने अभिव्यक्त करीत असतो. भावकाव्य लेखन करणाऱ्या प्रमुख कवींमध्ये कुसुमाग्रजाची सामाजिक भान असलेल्या भावकविता, केशवसुत यांची स्वातंत्र्य आणि नवचैतन्याने भारलेल्या कविता, वि. स. खांडेकर यांची करुणरसप्रधान आणि राष्ट्रप्रेमपर कविता, बा. भ. बोरकर यांची सौंदर्यदृष्टी आणि निसर्गप्रतिमा यांचा सुरेख संगम असलेली कविता, मंगेश पाडगांवकरांची प्रेम, वात्सल्य आणि जीवननिष्ठेने भारलेल्या कविता, शांता शेळके यांची कोमल भावना, आईचे प्रेम आणि निसर्गचित्रण करणारी कविता आणि इंदिरा संतांची वात्सल्यप्रधान आणि साध्या, सोप्या शैलीतील कविता मराठी साहित्यात विशेषत्वाने प्रत्ययास येते. यासारख्या अनेक कवींचे मराठी भावकवितेतील योगदान नाविन्यपूर्ण आहे.

## निष्कर्ष:

1. भावकविता ही साहित्याची आत्मा आहे. ती वाचकाला अंतर्मुख करते, त्याच्या भावविश्वाला
2. समृद्ध करते आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन व्यापक करते. भावकविता केवळ सौंदर्यप्रेरित नाही तर ती सामाजिक, आध्यात्मिक आणि संवेदनशीलतेचा सुंदर मिलाफ आहे.
3. संतकवी आणि आधुनिक कवी यांच्या भावकवितांमध्ये कालपरत्वे बदल झाले असले तरी त्या काव्यातील उत्कटता आणि भावनिक ताकद ही कायम आहे.
4. संत कवितांमध्ये भक्तिरस, समाजप्रबोधन, करुणा आणि भक्तांचे ईश्वराशी असलेले नाते दिसते, तर आधुनिक भावकाव्यात प्रेम, निसर्ग, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक परिवर्तनाचे विविध पैलू दिसतात.
5. भावकाव्य हा साहित्याचा आत्मा असून, तो मानवी भावनांचे प्रतिबिंब आहे. संत साहित्य आणि आधुनिक साहित्य या दोन्ही प्रवाहांतून भावकवितेने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.
6. भावकाव्याचा उगम हा प्राचीन संस्कृत काव्य, भक्तिसाहित्य आणि आधुनिक साहित्य यामध्ये शोधता येतो. हे काव्य हृदयस्पर्शी, आत्मसंवाद साधणारे आणि सौंदर्यपूर्ण अभिव्यक्ती असणारे आहे. भावकाव्याचा प्रवास हा संतसाहित्यातून सुरू होऊन आधुनिक कवितांपर्यंत पोहोचला आहे.

## संदर्भ सूची:


1. केतकर वि. स., मराठी काव्यशास्त्र, केशव भिकाजी ढेरे प्रकाशन, पुणे, १९८५, पृ.क्र.१२५
2. परांजपे रा. चिं., रससिद्धांत आणि मराठी काव्य, साहित्य प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.क्र.८०
3. करंदीकर ना. वा., रसतत्त्व आणि साहित्य, साकेत प्रकाशन, कोल्हापूर, १९८८, पृ.क्र.६५
4. खांडेकर, वि. स., रस आणि अनुभूती, गोखले प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.क्र.१५०
5. दाते, वसंत, संत साहित्य आणि भक्तिरस, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९८०, पृ.क्र.७०
6. चव्हाण, संदीप, भावकवितेची परंपरा आणि आधुनिक संदर्भ, उत्कर्ष प्रकाशन, नागपूर, २०१८, पृ.क्र.७०-९५
7. भवानी शंकर श्रीधर पंडित, आधुनिक मराठी कविता, सुविचार प्रकाशन मंडळ नागपूर, १९५२, पृ.क्र.२२